# रत्नागिरी रोटरी क्लबचे पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन

रत्नागिरी, २५ जुलै (वार्ताहर): रत्नागिरी परिसरात पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करून जल आणि वायू, ध्वनी, प्रदूषण टाळण्याचे आवाहन रोटरी क्लब ऑफ रत्नागिरीतर्फे अध्यक्ष रूपेश पेडणेकर, सचिव अॅड. मनीष नलावडे एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे हे आवाहन केले आहे.

गणेशोत्सवाचे वेध कोकणात सुरु झाले आहेत. गणपती मूर्ती शाडूच्या मातीने बनवण्याची पारंपरिक पद्धत होती. मात्र अलिकडे प्लास्टर ऑफ पॅरिसच्या आकर्षक मूर्ती वजनाला तुलनेने कमी असल्यामुळे ती घेण्याकडे लोकांचा कल वाढलेला दिसून येत आहे, परंतु यापासून बनवलेल्या मूर्तीचे विसर्जन केल्यावर सहज व लवकर विरघळत नाहीत. हलक्या असल्यामुळे पाण्याबरोबर इतस्तत: वाहत जातात. मूर्तीचे अवशेष नंतर पालापाचोळ्यात, कचऱ्यात, चिखलात विखुरलेले बघायला मिळतात: आपल्या दैवताची व आपल्या श्रद्धेची एकप्रकारे विटंबनाच बघायला मिळते. शिवाय मोठ्याप्रमाणात जल आणि वायू, ध्वनी प्रदूषण होते. यामुळे जैव विविधतेला हानी पोहोचते. हे आपण आता थांबवायला हवे. शाडू मूर्ती किंवा कागदाच्या लगद्यापासून लहान आकाराच्या पर्यावरणपूरक मूर्तीच घ्यायला हवी.

**BOD MEMBERS**

1) **Sachin Shinde :** Club Service
2) **Mandar Aacharekar :** Community Service
3) **Mandar Sawantdesai :** Vocational Service
4) **Hemal Kale :** International Service
5) **Devdatta Mukadam :** Membership
6) **Vinayak Hatkhambkar :** TRF
7) **Rohit Virkar :** Polio
8) **Ashok Ghate :** Sergeant and Arms
9) **Dharmsi Chauhan :** Club Administration
10) **Madhuri Kalambate :** Project Service
11) **Jayesh Kalokhe :** Public Relation Service
12) **Vijay Pawar :** IPP
13) **Shrikant Bhurke :** Vice President
14) **Sachin Sarolkar :** President Elected
15) **Rahul Pandit :** Executive Secretary

Rotary | THE MAGIC OF ROTARY

ROTARY CLUB OF RATNAGIRI

Rotary | THE MAGIC OF ROTARY

# ROTARY CLUB RATNAGIRI

**DIST. 3170 | CLUB 15680**

## Monthly Report

## July 2024



रोटे. रुपेश पेडणेकर
अध्यक्ष (२०२४-२५)



रोटे. अॅड. मनिष नलावडे
सचिव (२०२४-२५)



रोटे. माधुरी कळंबटे
खजिनदार (२०२४-२५)



**1 July 2024**
**DOCTORS & CA DAY CELEBRATION**

---

**1 July 2024**
**Guidance Program on Menstrual Health and Hygiene**



















**1 July 2024 : Tree plantation**
The Rotary Club of Ratnagiri successfully organized a tree plantation program on July 1, 2024, at the Someshwar Shantipith Vishwamandir Goshala,

---

**Tree plantation at Prachin Konkan Malgund, Ratnagiri**





---




**Wheelchair** was **donated** to **Shobha Dighamber Bondkar** a 70-year-old woman who suffered from hemiplegia and was unable to walk due to an accident. Additionally, she had vision impairment, making daily tasks and hospital visits challenging for her and her family

---

**9 July 2024**
**Guidance Camp for Pregnant and lactating Mothers**











**T-shirt distribution**

The T-shirt was unveiled by senior members of the club, including Dharmasi Chauhan, Dilip Bhatkar, Vinayak Hatkhambkar, Ghate Sir, President Rupesh Pednekar and Secretary Adv. Manish Nalawade.

---

**68 Installation Ceremony**




---



**11 July 2024**
1st General Meeting



---

Rotary Year 2024-25 Public Awareness Program on campaign to celebrate an eco-friendly Ganeshotsav festival in the Ratnagiri area










**25 July 2024**
Program on the topic of Konkan was held on July 25, 2024. The guest lecture by renowned expert Mr. Rajendra Masurkar

---

**25 July 2024**
2nd General Meeting





---



# रोटरी क्लब ऑफ रत्नागिरीचा पदग्रहण सोहळा दिमाखात संपन्न

रत्नागिरी, २५ जून (वार्ताहर)- रोटरी क्लब ऑफ रत्नागिरीचे अध्यक्ष आणि सर्व बोर्ड ऑफ डायरेक्टर्स यांचा पदग्रहण सोहळा रोटरी डिस्ट्रिक्ट ३१४१ चे माजी गव्हर्नर संदीप अगरवाला यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. रोटरी क्लब ऑफ रत्नागिरी अध्यक्षपदी रत्नागिरीतील युवा उद्योजक रुपेश पेडणेकर यांची तर सचिवपदी ॲड. मनिष नलावडे व खजिनदारपदी माधुरी कळंबटे यांची नियुक्ती करण्यात आली. नवनिर्वाचित अध्यक्ष रुपेश पेडणेकर यांना मानाची कॉलर प्रदान करून त्यांना अध्यक्षपदाची, ॲड. मनिष नलावडे यांना सेक्रेटरी पदाची तर माधुरी कळंबटे यांना खजिनदारपदाची सन्मानाची पिन देण्यात आली.

६८ व्या पदग्रहण सोहळ्याला रोटरीचे मावळते अध्यक्ष श्रीकांत भुके व सचिव प्रमोद कुलकर्णी यांनी नवीन पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच मागील वर्षातील त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याचा अहवाल उपस्थित सर्व मान्यवरांसमोर सादर केला.

यावेळी केतनकुमार चौधरी, ॲड. शाल्मली आंबुलकर, इन्स्टॉलेशन इव्हेंट चेअरमन निलेश मुळ्ये, रोटरी मिडटाऊन सदस्य, रोटरी क्लबचे सर्व सदस्य, व्यापारी आणि तमाम रत्नागिरीकर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सूत्रसंचलनाची जबाबदारी रोटे. राहुल पंडित आणि रोटे. मुग्धा कुळ्ये यांनी अतिशय उत्कृष्टपणे पार पाडली.

रोटरी क्लब मुंबईचे पीडीजी संदीप अग्रवाल म्हणाले की, भारतात जवळ जवळ २० कोटी प्रौढ असाक्षर आहेत. त्यांच्या साक्षरतेसाठी अजूनही आपण कार्य करणे आवश्यक आहे. त्यांनी स्वतः त्याबाबत मोठे पाऊल घेतले आहे. टीसीएससारख्या नामांकित कंपनी बरोबर जोडून त्यांनी ॲप्सा माध्यमातून शाळेतील मुले असाक्षर पालकांना शिकवण्याचे मिशन सुरू केले आहे. तसेच युनिसेफ बरोबर त्यांनी पालघर जिल्ह्यात हॅण्ड वॉश स्टॅंड देखील पुरविले आहेत. तसेच हृदयविकाराचा बालकां ना मोफत वैद्यकीय सेवा व ऑपरेशन त्यांचा क्लब मार्फत केले जाते. रत्नागिरी मधील बालकांसाठी कार्य करण्याचा त्यांनी मानस व्यक्त केला.

रोटरी क्लब ऑफ रत्नागिरीच्या पदग्रहण सोहळ्यानंतर नवे अध्यक्ष रुपेश पेडणेकर यांना शुभेच्छा देताना डिस्ट्रीक्ट गव्हर्नर संदीप अगरवाल. सोबत ॲड. मनिष नलावडे, खजिनदार माधुरी कळंबटे आदी.

